# मे. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई

सीएसए ७६७/२०१७
कंपनी कायदा, २०१३ खालील केसमध्ये (१८/२०१३)
कंपनी कायदा, २०१३ चे कलम २३० ते २३२ चे प्रकरणाबाबत
आणि
एकत्रिकरणाच्या योजनेबाबतच्या प्रकरणात
दरम्यान
**बालाजी अमाईन्स लि. (ट्रान्सफरी कंपनी)**
आणि
**भाग्यनगर केमिकल्स लिमिटेड (प्रथम ट्रान्सफरर कंपनी)**
आणि
**बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस् लिमिटेड (द्वितीय ट्रान्सफरर कंपनी)**
आणि

त्यांचे माननीय भागधारक आणि धनको

बालाजी अमाईन्स लिमिटेड, ही कंपनी कायदा, १९५६ च्या तरतुदीप्रमाणे बनविलेली कंपनी असून तिचा CIN नंबर L24132MH1988PLCO49387 आणि तिचे नोंदणीकृत ऑफीस बालाजी टॉवर्स, नं. ९/१अ/१, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर महाराष्ट्र-४१३२२४, भारत, तिचे प्रतिनिधीत्व पूर्णवेळ संचालक श्री. गड्डम हेमंथ रेड्डी, email : ghr@balajiamines.com, Ph. : 0217-2310824

...... अर्जदार/ट्रान्सफरर कंपनी

नोटीस आणि बालाजी अमाईन्स लिमिटेडच्या मिटिंगसाठी विविध धनकोंना वर्गीकरण करणार कंपनी.

आपल्याला अशी सूचना देण्यात येत आहे की, दिनांक २३ ऑगस्ट २०१७ च्या आदेशाने मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई पीठाने विविध धनकोंची सभा बालाजी अमाईन्स लिमिटेड (ट्रान्सफरी कंपनी) आणि भाग्यनगर केमिकल्स लिमिटेड (प्रथम ट्रान्सफरर कंपनी) आणि बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस् लिमिटेड (द्वितीय ट्रान्सफरर कंपनी) यांचे एकत्रिकरण करण्याच्या योजनेबाबत विचारविनिमय करण्यासाठी आणि जर योग्य वाटल्यास जसेच्या तशी किंवा जरूर त्या दुरुस्त्यानुसार एकत्रिकीरण योजना मंजूर करण्यासाठी त्याचे भागधारक व धनको यांची सभा बोलावण्याचा निर्देश दिला.

नोटीस आणि जाहीर नोटीस बालाजी अमाईन्स लिमिटेडच्या मिटिंगसाठी विविध धनकोंना वर्गीकरण घेणार कंपनी आपल्याला अशी सूचना देण्यात येते की २५ ऑक्टोबर २०१७ रोजी बालाजी अमाईन्स लिमिटेडच्या विविध धनकोंची सभा दुपारी २.०० वाजता कंपनीचे नोंदणीकृत ऑफीसमध्ये म्हणजे बालाजी टॉवर्स, नं. ९/१अ/१, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर महाराष्ट्र-४१३२२४, भारत येथे होईल. तरी विविध धनकोंनी ज्यांना कंपनी ३१/३/२०१७ पर्यंतचे देणे लागते त्यांनी सदर वेळी व सदर ठिकाणी हजर रहावे व मतदान करावे, अशी विनंती करण्यात येते.

सदर योजनेच्या प्रती आणि कलम २३० अन्वये स्टेटमेंट कंपनीच्या नोंदणीकृत ऑफीसमधून किंवा त्याचे सल्लागार श्री. वाय. सूर्यनारायण यांचे ऑफीसमधून म्हणजे प्लॉट नं. १०६, पहिला मजला, निर्मल टॉवर्स, २००, साईबाबा मंदिराजवळ, द्वारकापुरी कॉलनी, पंजागुट्टा, हैद्राबाद-५०००८२ विनामूल्य मिळतील. ज्या व्यक्ती बालाजी अमाईन्स लिमिटेडचे विविध धनकोला सभेला हजर राहण्यास व मतदान करण्यास पात्र असतील ते व्यक्तीशः किंवा प्रतिनिधीमार्फत मतदान करू शकतील, त्यासाठीचा जरूर तो फॉर्म कंपनीच्या नोंदणीकृत ऑफिसात म्हणजे बालाजी टॉवर्स, नं. ९/१अ/१, होटगी रस्ता, आसरा चौक, सोलापूर महाराष्ट्र-४१३२२४, भारत सभेच्या ४८ तास अगोदर जमा केलेला असल्यास.

प्रतिनिधीत्वासाठीचा फॉर्मदेखील कंपनीचे नोंदणीकृत ऑफीसमध्ये उपलब्ध असेल. मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई पीठाने श्री. गड्डम हेमंथ रेड्डी, संचालक आणि कंपनीचे अधिकारीक प्रतिनिधी यांची नेमणूक, त्यांचे गैरहजेरीत डी. राम रेड्डी, संचालक आणि कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी चेअरमन आणि श्री. लोकेश अग्रवाल, कंपनी सेक्रेटरी यांची सदर सभेचे निरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे. जर वर नमूद केलेली एकत्रिकरणाची योजनेस सभेने मंजूर केल्यास तर ती मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाचे मंजुरीचा विषय होईल.

सही/-
**गड्डम हेमंथ रेड्डी,**
अध्यक्ष,
विविध धनकोची न्यायाधिकरणाने
बोलावलेल्या सभेचे,
बालाजी अमाईन्स लिमिटेड
DIN : 00003868

दिनांक २२ सप्टेंबर २०१७
हैद्राबाद